अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत सुधारीत <u>योजना राबविण्यास मान्यता देण्याबाबत.</u>

**महाराष्ट्र शासन**
**कौशल्य विकास व उद्योजकता विकास विभाग**
**शासन निर्णय क्र.अपाम २०१७/प्र.क्र. १८९/रोस्वरो -१**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.
दिनांक : २१ नोव्हेंबर, २०१७

**<u>वाचा</u> :-** १) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई संचालक मंडळाच्या ५९ व्या बैठकीतील बाब क्र. १०

२) अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ मर्यादित, मुंबई यांचे पत्र क्र. APM/ADM/ ३१७/२०१७, दि.३१.१०.२०१७.

३) कौशल्य विकास व उद्योजकता विभाग शा.नि.क्र.अपाम २०१६/प्रक्र.१८७/रोस्वरो-१, दि. ३१.३.२०१७

४) सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग शा. नि. क्र. सीबीसी -१०/२०१७/प्र.क्र.१९६/मावक, दि.४.१०.२०१७

**<u>प्रस्तावना</u> -**

सद्य:स्थितीत भारत हा एक जास्तीत जास्त तरुण लोकसंख्या असलेला देश असून एकूण लोकसंख्येच्या ६२ टक्के लोकसंख्या ही १५ ते ५९ वर्षे या कार्यप्रवण वयोगटातील आहे. तसेच एकूण लोकसंख्येच्या ५४ टक्के लोकसंख्या ही वय वर्षे २५ च्या आतील आहे. सन २०२० पर्यंत भारतातील लोकसंख्येचे सरासरी वयोमान हे २९ वर्षे राहील. या तरुण मनुष्यबळास कौशल्य विकास योजनेच्या माध्यमातून कुशल बनविणे, राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावरील कुशल मनुष्यबळाची गरज भागविणे व या उत्पादनक्षम वयोगटातील उमेदवारांना रोजगार/स्वयंरोजगार करण्यास सक्षम करुन त्यांचे जीवनमान उंचावण्याच्या दृष्टीने मा. पंतप्रधानांनी सन २०१४ पासून "Make in India" संकल्पनेस अनुसरुन "Skill India" कार्यक्रमास प्राधान्य दिले आहे.

राज्यातील आर्थिकदृष्टया मागास घटकातील उद्योजक बनू इच्छिणाऱ्या व तशी क्षमता असलेल्या तरुणवर्गाला आर्थिक सहाय्य पुरविण्याच्या दृष्टीने अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळामार्फत बीज भांडवल कर्ज योजना व गट प्रकल्प कर्ज योजना या दोन योजना राबविण्यात येत आहेत.

मागणी नसल्याने सन २०१० नंतर गट प्रकल्प कर्ज योजनेंतर्गत कोणत्याही गटास कर्ज वाटप करण्यात आलेले नाही. तसेच बीज भांडवल कर्ज योजनेंतर्गत असा अनुभव आहे की, कर्ज वाटप केल्यानंतर लाभार्थ्यांनी कर्जाची परतफेड केलेली नाही. यामुळे वेळोवेळी कर्ज माफ करण्याची वेळ शासनावर आली आहे. एकंदरीतच महामंडळाच्या दोन्ही योजनांना जास्त लाभार्थी प्राप्त न झाल्याने, तसेच मराठा मोर्चाच्या अनुषंगाने विधीमंडळात मा. मुख्यमंत्री महोदय यांनी घोषित केलेल्या विविध निर्णयांवरील कार्यवाहीचा आढावा घेण्यासाठी नियुक्त करण्यात आलेल्या मंत्रीमंडळ उपसमितीच्या दिनांक २४/१०/२०१७ रोजी झालेल्या बैठकीत दिलेल्या निदेशानुसार खालील प्रमाणे नवीन योजनांना शासन मान्यता देण्याचे शासनाच्या विचाराधीन होते.

**शासन निर्णय :**

सध्या अस्तित्वात असलेल्या योजना १) बीज भांडवल कर्ज योजना व २) गट प्रकल्प कर्ज योजना या दोन योजना बंद करुन खालील तीन योजना सुरु करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

१) **वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना** - नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या व बँकेने रु. १०.०० लाखापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येत आहे. **(प्रपत्र-अ प्रमाणे)**

२) **गट कर्ज व्याज परतावा योजना** - नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या उमेदवारांच्या गटासंदर्भात, बँक कर्ज मर्यादा प्रती गटास कमीत कमी रु.१०.०० लाख ते जास्तीत जास्त रु.५०.०० लाखापर्यंतच्या देण्यात आलेल्या उद्योग उभारणी कर्जावर ५ वर्षा पर्यंत अथवा कर्ज कालावधी या पैकी जे कमी असेल ते, जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराने आणि रु.१५.०० लाखाच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येत आहे. **(प्रपत्र-ब प्रमाणे)**

३) **गट प्रकल्प कर्ज योजना** -महामंडळामार्फत सदर योजनेंतर्गत, नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या उमेदवारांच्या पात्र शेतकरी उत्पादक ( F.P.O.) गटांना (Farmers Producers Organisation-FPO, कंपनी कायदा, २०१३ अन्वये स्थापन झालेले) रु. १०.०० लाखा पर्यंत **बीनव्याजी** दराने कर्ज रक्कम उद्योगाकरिता देण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येत आहे. **(प्रपत्र-क प्रमाणे)**

३. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या सहमतीने व त्यांच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक२३४/व्यय-६, दिनांक १५/११/२०१७ च्या अन्वये निर्गमित करण्यात येत आहे.

४. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१७११२११५१६०८७३०३ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

S.G. Patil

Digitally signed by S.G. Patil
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=SDED, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=f64f9296da4ba15d02d3ad3826a21a74ed080355ac04eef5617c3b4f08af47ae, cn=S.G. Patil
Date: 2017.11.21 15:20:00 +05'30'

( सं.गि.पाटील )
शासनाचे उप सचिव

**प्रति,**

१. मा. राज्यपालांचे सचिव
२. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव
३. मा.विरोधी पक्ष नेता (विधानसभा / विधानपरिषद ), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, मुंबई.
४. मा. सर्व मंत्री /राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव
५. अध्यक्ष/व्यवस्थापकीय संचालक, अण्णासाहेब पाटील आर्थिक मागास विकास महामंडळ, मुंबई
६. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन
७. मंत्रालयीन विभागाचे अपर मुख्य सचिव / प्रधान सचिव / सचिव
८. महालेखापाल, महाराष्ट्र१ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), मुंबई
९. महालेखापाल, महाराष्ट्र२ (लेखा परीक्षा / लेखा व अनुज्ञेयता ), नागपूर.
१०.आयुक्त, कौशल्य विकास व रोजगार व उद्योजकता संचालनालय, नवी मुंबई.
११.वित्त विभाग (अर्थसंकल्प-१९, व्यय-६ व साऊ )
१२.सर्व सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र
१३.सर्व जिल्हा कोषागार अधिकारी
१४.अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई
१५.निवासी लेखा परीक्षा अधिकारी, मुंबई.
१६.उप कोषागार अधिकारी, कोकण भवन, नवी मुंबई
१७.निवडनस्ती (रोस्वरो -१ )

## प्रपत्र-अ
## १. वैयक्तिक कर्ज व्याज परतावा योजना

**१. उद्देश :-**

या महामंडळा मार्फत आर्थिक दृष्ट्या मागास उमेदवारांना बँके तर्फे स्वयंरोजगार उभारणी करिता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रक्कमे वरील **व्याज परतावा** हा बँक प्रमाणिकरणानुसार महामंडळाकडून केला जाईल.

**२. आर्थिक सहाय्य :-**

- नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या व बँकेने रुपये १०.०० लाखापर्यंतच्या मर्यादेत कर्ज मंजूर केलेल्या उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत ) त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल.

- या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येत आहे. असे प्रस्ताव मिळालेल्या प्राप्त तारखेनुसार (First Come First Receiver या तत्वावर) निवडले जातील.

**३. प्रकल्पाचे क्षेत्र (पूर्णत: महाराष्ट्र राज्यातीलच असावे) :-**

i. कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रम
ii. लघु व मध्यम उद्योग - अ)उत्पादन, ब) व्यापार व विक्री
iii. सेवा क्षेत्र

**४. लाभार्थी अटी व शर्ती :-**

i. महाराष्ट्राचा रहिवाशी असावा.
ii. लाभार्थ्याचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहील.
iii. वय वर्ष १८ ते ४५ दरम्यान असावे.
iv. वेबपोर्टल वर नाव नोंदणी अनिवार्य.
v. लाभार्थ्याचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न, नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असावे.
vi. दिव्यांग उमदेवाराकडे सक्षम यंत्रणेने दिलेले प्रमाणपत्र असावे.

**५. इतर अटी व शर्ती : -**

i. उमेदवाराने अर्ज करते वेळी या प्रकल्पासाठी व यापूर्वी महामंडळाच्याइतर महामंडळाच्या कोणत्याही योजनाचा लाभ घेतलेला नसावा.

ii. उमेदवार कोणत्याही बँकेचा/वित्तीय संस्थांचा थकबाकीदार नसावा.

iii. उमेदवाराने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे.

iv. एका व्यक्तीला केवळ एकदाच या योजनेचा लाभ घेता येईल.

**६. उमेदवारांची नाव नोंदणी -**

उमेदवारांनी शासनाच्या अधिकृत वेबपोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक असेल. प्रस्ताव सादर केल्यावर दिलेल्या अटी व शर्तीनुसार प्रस्ताव पात्र ठरत असल्यास उमेदवारांस संगणीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent)/मंजूरीपत्र दिले जाईल. उमेदवाराने या आधारे बँकेकडून प्रकरणावर कर्ज मंजूर करुन घ्यावे.

**७. परतावाच्या अटी :-**

i. जर लाभार्थ्याने मध्येच नियमित कर्ज परतफेड नाही केली तर व्याज परतावा दिला जाणार नाही.

ii. लाभार्थ्यांने ऑनलाईन पोर्टलवर उद्योग सुरु असल्याचे किमान दोन फोटो अपलोड करावेत.

**८. महामंडळा मार्फत लाभार्थ्या स कर्जाच्या व्याज रक्कमेचा परतावा :-**

उमेदवाराने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत ) त्याच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा मंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएफएस) अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल, या ऐवजी इतर कोणतेही Charges/ Fees/देयके अदा करणार नाही.

**९. प्रशासकीय बाबीं वरील खर्च :-**

प्रती वर्षी प्राप्त भाग भांडवलातून २टक्के रक्कम योजनेच्या अंमलबजावणीकरिता खालील बाबींकरिता निधी राखीव ठेवण्यात येईल.

अ) महामंडळाच्या अधिकारी/कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, योजनेची प्रसिध्दी इतर प्रशासकीय खर्चाकरिता

ब) योजनेच्या संगणकीकृत अंमलबजावणीकरिता लागणारा खर्च

**१० योजनेचे सर्वसाधारण संनियंत्रण:-**

अ) दरवर्षी महामंडळामार्फत केले जाईल.

ब) महामंडळाचे जिल्हा स्तरावरील कामकाज आवश्यकतेनुसार सहाय्यक संचालक, जिल्हा विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र हे पाहतील.

**************

**प्रपत्र-ब**

**२. गट कर्ज व्याज परतावा योजना**

**१. उद्देश :-**

आर्थिकदृष्ट्या मागास घटकातील उमेदवारांचा बचत गट, भागीदारी संस्था, सहकारी संस्था, कंपनी, LLP, FPO अशा शासन प्रमाणिकरण प्राप्त संस्थाना बँकेतर्फे स्वयंरोजगार उद्योग उभारणी करिता जे कर्ज दिले जाईल, त्या कर्ज रक्कमे वरील **व्याज परतावा** हा बँक प्रमाणीकरणानुसार महामंडळाकडून अदा केला जाईल.

**२. आर्थिक सहाय्य :-**

- नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या उमेदवारांच्या गटासंदर्भात, बँकेकडून प्रती गटास कमीत कमी रु.१०.०० लाख ते जास्तीत जास्त रु.५०.०० लाखापर्यंतच्या देण्यात आलेल्या उद्योग उभारणी कर्जावर ५ वर्षा पर्यंत अथवा कर्ज कालावधी या पैकी जे कमी असेल ते, कर्ज मंजूर केलेल्या गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर जास्तीत जास्त १२ टक्के व्याज दराच्या आणि रु.१५.०० लाखाच्या मर्यादेत त्यातील व्याजाची रक्कम त्यांच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा महामंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल.
- या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी (सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येईल.

**३. प्रकल्पाचे क्षेत्र (पूर्णत: महाराष्ट्र राज्यातीलच असावे) :-**

i. कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रम
ii. लघु व मध्यम उद्योग - अ)उत्पादन, ब) व्यापार व विक्री
iii. सेवा क्षेत्र

**४. प्रकल्प क्षेत्रानुसार लक्ष्यांक अंदाजपत्रक :-**

| | | |
|---|---|---|
| १. | कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रम | एकूण आर्थिक तरतुदीच्या ६०% रक्कम |
| २. | लघु व मध्यम उद्योग -<br>अ) उत्पादन, ब) व्यापार व विक्री | एकूण आर्थिक तरतुदीच्या ४०% रक्कम |
| ३. | सेवा क्षेत्र | |

**५. लाभार्थी अटी व शर्ती :-**

i. गटातील लाभार्थी हे महाराष्ट्राचे रहिवाशी असावेत.
ii. गटातील लाभार्थ्याचे कर्ज खाते आधारकार्ड लिंक असणे अनिवार्य राहील.

iii. वय वर्ष १८ ते ४५ दरम्यान असावे.

iv. वेबपोर्टल वर नाव नोंदणी अनिवार्य.

v. गटातील सर्व लाभार्थ्याचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न, नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असावे.

vi. दिव्यांग उमदेवाराकडे सक्षम यंत्रणेने दिलेले प्रमाणपत्र असावे.

**६. इतर अटी व शर्ती : -**

i. खालील प्रकारचे गट या योजनेंतर्गत पात्र असतील.

a. शासनमान्य बचत गट (इतर कोणत्याही शासकीय योजनेत मान्य असलेले)

b. भागिदारी संस्था (निबंधक, महाराष्ट्र राज्य, भागिदारी संस्था, मुंबई यांनी प्राधिकृत केलेले.)

c. सहकारी संस्था (जिल्हा उपनिबंधक यांनी प्राधिकृत केलेले.)

d. कंपनी/Limited Liability Partnership (LLP)/Society (कंपनी कायदा, २०१३ च्या Web Portal नुसार.)

ii. गटातील उमेदवाराने अर्ज करते वेळी या प्रकल्पासाठी व यापूर्वी महामंडळाच्या वाइतर महामंडळाच्या कोणत्याही योजनाचा लाभ घेतलेला नसावा.

iii. गटातील उमेदवार कोणत्याही बँकेचा/वित्तीय संस्थांचा थकबाकीदार नसावा.

iv. गटाने कर्ज प्रकरण हे सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएमएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे प्रकरण हाताळण्यास सक्षम असलेल्या बँकेत केलेले असावे.

v. गटातील उमेदवाराने/व्यक्तीने या महामंडळाच्या व इतर महामंडळाच्या गट किवां वैयक्तिक योजनांचा लाभ घेतलेला नसावा.

vi. ही योजना सद्य:स्थितीत अस्तित्वात असलेल्या व्यवसायाच्या विस्तारासाठी व योजनेची अंमलबजावणी सुरु केल्यानंतर स्थापन झालेल्या नवीन उद्योगांसाठी लागू असेल.

**७. गटाची नावनोंदणी -**

गटातील उमेदवारांनी शासनाच्या अधिकृत वेबपोर्टलवर अर्ज सादर करणे बंधनकारक असेल. प्रस्ताव सादर केल्यावर दिलेल्या अटी व शर्तीनुसार प्रस्ताव पत्र ठरत असल्यास गटास संगणीकृत सशर्त हेतूपत्र (Letter of Intent ) दिले जाईल. गटाने या आधारे बँकेकडून प्रकरणावर कर्ज मंजूर करुन घ्यावे.

**८. महामंडळामार्फत गटाच्या कर्जाच्या व्याज रक्कमेचा परतावा :-**

- गटाने वेळेत कर्जाचे हप्ते भरल्यास, हप्ता भरल्यावर त्यातील व्याजाची रक्कम (१२ टक्केच्या मर्यादेत अथवा रु. १५.०० लाखाच्या मर्यादेत) त्याच्या आधार लिंक बँक खात्यात दरमहा

मंडळामार्फत जमा करण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली (पीएफएफएस) या अथवा तत्सम संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल.

- महामंडळ केवळ बँकेने वेळेत वसूल केलेली योग्य व्याज रक्कम अदा करेल, या ऐवजी इतर कोणतेही Charges / Fees/देयके अदा करणार नाही.

**९. प्रशासकीय बाबींवरील खर्च :-**

प्रती वर्षी प्राप्त भाग भांडवलातून २टक्के योजनेच्या अंमलबजावणीकरिता खालील बाबींकरिता निधी राखीव ठेवण्यात येईल.

अ) महामंडळाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, योजनेची प्रसिध्दी इतर प्रशासकीय खर्चाकरिता

ब) योजनेच्या संगणीकृत अंमलबजावणीकरिता लागणारा खर्च

**१० योजनेचे सर्वसाधारण संनियंत्रण:-**

अ) दरवर्षी महामंडळामार्फत केले जाईल.

ब) महामंडळाचे जिल्हास्तरावरील कामकाज आवश्यकतेनुसार सहाय्यक संचालक, जिल्हा विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र हे पाहतील.

**************

**प्रपत्र-क**

## ३. गट प्रकल्प कर्ज योजना

### १. योजनेचा उद्देश

महामंडळामार्फत सदर योजनेंतर्गत पात्र शेतकरी उत्पादक ( F.P.O.) गटांना रु. १०.०० लाख पर्यंत **बीनव्याजी** दराने कर्ज रक्कम उद्योगाकरिता देण्यात येईल. सदर योजना संपूर्णपणे संगणकीकृत असून प्रक्रीया सार्वजनिक वित्तीय व्यवस्थापन प्रणाली ( पीएफएमएस) या संगणक प्रणालीद्वारे राबविण्यात येईल. तसेच या योजनेकरिता एकूण प्रस्तावित निधीच्या किमान ४ टक्के निधी दिव्यांगांसाठी(सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभागाने त्यांच्या अधिसूचनेत नमूद केलेल्या दिव्यांगांच्या व्याख्येनुसार) राखीव ठेवण्यात येईल.

### २. आर्थिक सहाय्याचा तपशिल

महामंडळामार्फत सदर योजनेंतर्गत, नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असलेल्या उमेदवारांच्या पात्र शेतकरी उत्पादक ( F.P.O.) गटांना (Farmers Producers Organisation-FPO, कंपनी कायदा, २०१३ अन्वये स्थापन झालेले) रु. १०.०० लाखा पर्यंत **बीनव्याजी** दराने कर्ज रक्कम उद्योगाकरिता देण्यात येईल.

### ३. लाभार्थ्यांच्या पात्रतेच्या अटी

i. गटातील उमेदवार **महाराष्ट्र** राज्याचा **रहिवासी** असावा.
ii. गटातील उमेदवाराचे **किमान वय १८ वर्षे** असावे.
iii. गटातील उमेदवारांकडे **आधारकार्ड** असणे **बंधनकारक** राहील.
iv. गटातील उमेदवारांनी https://www.mahaswayam.in या अथवा कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या वेबपोर्टलवर नाव नोंदणी करणे बंधनकारक राहील.
v. महामंडळाच्या इतर कोणत्याही योजनेचा लाभ घेतलेला नसावा.
vi. किमान एक भागीदार/उमेदवाराची किमान शैक्षणिक अर्हता इयत्ता १० **वी उत्तीर्ण** असावी.
vii. गटातील सर्व लाभार्थ्यांचे प्रमाणित वार्षिक कौटुंबिक उत्पन्न, नॉन-क्रिमिलेअर करिता असलेल्या कौटुंबिक वार्षिक उत्पन्न मर्यादेत (सक्षम प्राधिकरणाने वेळोवेळी दिलेल्या प्रमाणपत्रानुसार) असावे.
viii. दिव्यांग उमदेवाराकडे सक्षम यंत्रणेने दिलेले प्रमाणपत्र असावे.

### ४. प्रकल्पाचे क्षेत्र (पूर्णत: महाराष्ट्र राज्यातीलच असावे) :-

i. कृषी, संलग्न व पारंपारिक उपक्रम
ii. लघु व मध्यम उद्योग - अ)उत्पादन, ब) व्यापार व विक्री
iii. सेवा क्षेत्र

### ५. इतर अटी

i. अर्जदार गट व संस्था कोणत्याही बँक/वित्तीय संस्थांचा **थकबाकीदार नसावा**.
ii. गटाचे भागीदार यांचे **खाते** हे राष्ट्रीयकृत/शेड्युल्ड बँकेत/ किमान ५०० कोटीच्या वर ठेवी असलेली बँक ज्यांची Core Banking System (CBS) आहे.

iii. **गटाचे भागीदार** गटाच्या बँक खात्यात गटाचा **हिस्सा** म्हणून प्रकल्प किंमतीच्या **१०%** रक्कम महामंडळाचा हिस्सा वाटप करण्यापूर्वी जमा करणे आवश्यक आहे.

**६. योजनेची अमंलबजावणी पुढीलप्रमाणे :**

**६.१ योजनेचा प्रचार व प्रसार :** विविध माध्यमामार्फत महामंडळस्तरावरून प्रचार व प्रसिद्धी करण्यात येईल.

**६.२ गट/संस्थांची नाव नोंदणी :** इच्छूक गट/**संस्था** https://www.mahaswayam.in या अथवा कौशल्य विकास व उद्योजकता विभागाच्या वेबपोर्टलवर नाव नोंदणी करणे बंधनकारक राहील.

**६.३ प्रस्ताव मागणी : अर्जदार गट/संस्थाकडून** जिल्हास्तरांवर विविध माध्यमांचा वापर करून **ऑनलाईन प्रस्ताव** मागविण्यात येतील. सदर प्रस्ताव विहीत प्रकल्प अहवालासह सादर करणे आवश्यक राहील.

**६.४ प्रस्तावांची प्राथमिक छाननी :** सहाय्यक संचालक, जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र हे कागदपत्रे अपूर्ण असल्यास संबंधितांकडून सदर कागदपत्रांची पूर्तता करून घेतील.

**६.५ क्षेत्रिय भेट/स्थळ पहाणी :** स्थळ पहाणी ही आवश्यकतेप्रमाणे संबंधित उद्योग / व्यवसायातील तज्ञ व्यक्तींमार्फत महामंडळाच्या निर्देशान्वये केली जाईल. सदर तज्ञ व्यक्तीस महामंडळाच्या विहित पद्धतीप्रमाणे मानधन अनुज्ञेय राहील.

**६.६ जिल्हास्तरीय आढावा समिती :** जिल्हास्तरीय "आदर्श ग्राम आढावा समिती" मार्फत योजनेचा सहामाही आढावा घेतला जाईल .

**६.७ प्रस्तावासंबंधी महामंडळास आवश्यक बाबींची पूर्तता :** गटाने सादर केलेल्या ऑनलाईन प्रस्तावांची तपासणी अंती आढळलेल्या त्रूटींची पूर्तता करण्याची जबाबदारी लाभार्थी गटाची राहील.

**६.८ महामंडळस्तरावर प्रस्तावास अंतिम मंजुरी :**

i. दस्तावेज तपासणी, स्थळ पाहणी पूर्ण व त्रूटी पूर्तता झाल्यानंतर गट प्रकल्प कर्ज प्रकरणे महामंडळास प्राप्त झाल्यानंतर पुढील ३० **दिवसांत** प्रस्तावास **महामंडळ स्तरावर** मंजुरी संदर्भात कार्यवाही पुर्ण करणे आवश्यक राहील.

ii. प्राथमिक मंजुरीस पात्र / मंजूर / कारणमीमांसेसह नामंजूर प्रकरणे इ. बाबतची माहिती पहाण्याची सोय महामंडळाच्या वेबपोर्टलवर उपलब्ध राहील.

**७. कर्ज मंजूरीनंतर पूर्तता करावयाची कागदपत्रे :** मंजूर कर्ज प्रकरणी महामंडळामार्फत देण्यात येणाऱ्या आर्थिक सहाय्याचा निधी संबंधित गटाच्या **बँक खात्यात वळती** करण्याच्या दृष्टीने संबंधित गट/ संस्थेकडून खालील **वैधानिक कागदपत्रांची** पुर्तता ऑनलाईन करतील. यासंबंधीचे विहित नमुने महामंडळाच्या वेबसाईटवर उपलब्ध असतील.

७.१ **करारपत्रे**

अ) भागीदारी संस्थेतर्फे/सर्व भागीदार आणि महामंडळ यातील करार ( Loan Agreement ) शासनाने निश्चित केलेल्या दराच्या स्टँप पेपरवर,

ब) महामंडळाने दिलेल्या ऑनलाईन नमुन्यानुसार Joint Liability Statement,

७.२ **कर्ज रक्कम** प्राप्त झाल्याची **पोच पावती** (Online Format प्रमाणे) ,

७.३ कर्ज वसुलीसाठीचे **आगावू धनादेश** (PDC),

७.४ अर्जदार गट/संस्थेच्या संबंधित बँक खात्यात गट / संस्था **सहभागाची** १०% रक्कम जमा असल्याबाबत **बँक खात्याच्या पासबुकची** छायांकीत प्रत,

७.५ संबंधित व्यवसायाकरिता आवश्यक **परवान्यांची प्रत**, प्रकल्पाच्या किमतीत अंतर्भूत असलेल्या यंत्रसामुग्री/साधनसामुग्रीचे **दरपत्रक**,

७.६ व्यवसाय सुरु करावयाच्या **जागे संदर्भातील दस्तऐवज** (उदा.करारनामा/भाडेपावती/ना-हरकत प्रमाणपत्र),

७.७ जागेचा ७/१२ उतारा, स्थावर जंगम मालमत्ता धारकाचे मुल्यांकन / PR Card/नमुना-८अ मुल्यांकन देण्यात येणाऱ्या कर्ज रक्कमेच्या पेक्षा अधिक असणे आवश्यक,

७.८ हायपोथीकेशन डीड/नोंदणीकृत गहाणखत, शुअरीटी बॉड, जनरल करारनामा, रक्कम पोचपावती, वचन चिठ्ठी.

**ऑनलाईन अर्ज व ७.१ ते ७.८ च्या प्रिंटेड कॉपी (स्वप्रमाणीत केलेल्या ), Post Dated Cheques (PDC) हे स्वतंत्ररित्या महामंडळास सादर करावेत.**

८. **कर्जाच्या रक्कमेचे वितरण :** महामंडळाच्या विहीत अटी, शर्ती व विविध कागदपत्रे पूर्तता करणाऱ्या अर्जदार गटास / संस्थेस Direct Bank Transfer द्वारे / विहीत पध्दतीने निधीचे वितरण करण्यात येईल.

**९. वित्तीय सहाय्याची परतफेड :**

a. वसुली ही कर्जाची रक्कम जमा झाल्यापासून सहा महिने पूर्ण झाल्यानंतर **सातव्या महिन्यापासून** सुरु करण्यात येईल.

b. गट/संस्थेने सदर वित्तीय सहाय्याची **परतफेड सात वर्षात** (**८४ महिने**) करावयाची आहे.

c. याकरिता विहित पद्धतीचा अवलंब करण्यात येईल. तसेच कॅशलेस पद्धतीचा प्राधान्यक्रमाने अवलंब करण्यात येईल.

**१०. दंडनीय कार्यवाही**

- लाभार्थ्यांकडून वित्तीय सहाय्याची नियमित परतफेड होत नसल्यास त्यांचेविरुद्ध **निगोशिएबल इन्स्ट्रुमेंट ॲक्ट, १८८१** मधील कलम १३८ नुसार कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
- आवश्यकता असल्यास **महाराष्ट्र लॅण्ड रेव्हेन्यू कोड** (MLRC) नुसार वित्तीय सहाय्याची परतफेड करण्यास टाळाटाळ करणाऱ्या संस्थेवर **जिल्हाधिकारी** यांच्यामार्फत न्यायालयीन कार्यवाही करण्यात येईल व सदर कार्यवाहीचा **खर्च संबंधित संस्थेकडून वसूल** केला जाईल.
- गटाने कर्जाची रक्कम न फेडल्यास महामंडळाच्या नावे तारण असलेल्या मालमत्तांद्वारे वसुली अथवा कायदेशीर कार्यवाही करण्यात येईल.
- **थकीत कर्ज रकमेवर ४%** अधिकचे **दंडनीय व्याज** आकारण्यात येईल.

**११. जनजागृती कार्यशाळा :** जनजागृती कार्यशाळा महामंडळाच्यास्तरावरून राबविण्यात येईल.

**१२. प्रशासकीय बाबींवरील खर्च :-**

प्रती वर्षी प्राप्त भाग भांडवलातून २टक्के योजनेच्या अंमलबजावणीकरिता खालील बाबींकरिता निधी राखीव ठेवण्यात येईल.

अ) महामंडळाच्या अधिकारी / कर्मचाऱ्यांचे प्रशिक्षण, योजनेची प्रसिध्दी इतर प्रशासकीय खर्चाकरिता,

ब) योजनेच्या संगणीकृत अंमलबजावणीकरिता लागणारा खर्च.

**१३. योजनेचे मूल्यमापन :** योजनेच्या उद्दिष्टानुसार फलनिष्पतीची तपासणी करणे व योजनेचे सर्वंकष मूल्यमापन करणे या करिता महामंडळामार्फ़त **त्रयस्थ संस्थेद्वारे** योजनेचे **दर दोन वर्षांनी मुल्यांकन** करण्यात येईल व त्यानुसार त्यात **आवश्यकता असल्यास** योग्य त्या **सुधारणा महामंडळा मार्फत** करण्यात येतील.

**१४. ऑनलाईन प्रणाली :** संपूर्ण प्रक्रिया संगणकीकृत ऑनलाईन पद्धतीने असेल.

*****